# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - डी-४०/गुणपडताळणी/फोटोकॉपी/२०२३/ ११५

दिनांक – 22 FEB 2023

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## हिवाळी परिक्षा – २०२२

**(अ) गुणपडताळणी / फोटोकॉपी बाबतचे वेळापत्रक**

**कालावधी दि. २४.०२.२०२३ ते १४.०३.२०२३**

| अ.क्र. | कार्यवाही | कालावधी व दिनांक |
|---|---|---|
| १) | गुणपडताळणी/फोटोकॉपी करीता विद्यार्थ्यांनी Candidate Login द्वारे अर्ज सादर करण्याचा कालावधी | २४.०२.२०२३ ते २७.०२.२०२३ |
| २) | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी गुणपताळणी/फोटोकॉपीच्या सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी | २५.०२.२०२३ ते २८.०२.२०२३ |
| ३) | विभागीय कार्यालयांनी RBTE Login द्वारे संस्थांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज विभागीय कार्यालयाद्वारे अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी. | २५.०२.२०२३ ते ०१.०३.२०२३ |
| ४) | विभागीय कार्यालयांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची माहिती मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०१.०३.२०२३ |
| ५) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या गुणपडताळणी/ फोटोकॉपी अर्जानुसार संबंधित गुणमुल्यांकन केंद्र व विभाग़ीय कार्यालयांना माहिती पाठविण्याचा दिनांक | ०२.०३.२०२३ |
| ६) | गुणमुल्यांकन केंद्राने मंडळाच्या निर्देशानुसार मूळ उत्तरपत्रिकांमधील गुणांची पडताळणी करण्याची कार्यवाही व मुळ उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती काढण्याचा कालावधी | ०२.०३.२०२३ ते ०६.०३.२०२३ |
| ७) | गुणमुल्यांकन केंद्राने कार्यवाही पूर्ण करुन संबंधीत पी सी डी सी (PCDC) कडे खालील प्रमाणे सिलबंद पाकीटे पाठविण्याचा कालावधी<br>(अ) गुणपताळणी/फोटोकॉपी यामध्ये गुणबदल (**Change Case**) झालेल्या प्रकरणांची मूळ उत्तरपत्रिका<br>(ब) फोटोकॉपी मधील गुणात बदल न झालेल्या (**No Change Case**) प्रकरणांची मूळ उत्तरपत्रिका<br>(क) फोटोकॉपीसाठी अर्ज केलेल्या सर्व उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपींच्या प्रती | ०६.०३.२०२३ ते ०९.०३.२०२३ |
| ८) | गुणबदल (Change Case) प्रकरणांची विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती गठीत करुन तपासण्याचा व मंडळाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याचा कालावधी | १०.०३.२०२३ ते ११.०३.२०२३ |
| ९) | पी सी डी सी ने प्राप्त फोटोकॉपी पाकीटे संस्था निहाय वर्गीकरण करुन संबंधित संस्था निहाय त्या विभागातील पी सी डी सी कडे पाठविण्याचा कालावधी | १०.०३.२०२३ ते १२.०३.२०२३ |
| १०) | गुणांमधील बदल झालेली प्रकरणे विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ११.०३.२०२३ |
| ११) | पी सी डी सी ने फोटोकॉपी उत्तरपत्रिका संबंधीत संस्थेला देण्याचा कालावधी | १३.०३.२०२३ ते १४.०३.२०२३ |
| १२) | संस्थेने आवश्यक नोंद करुन संबंधित विद्यार्थ्यास उत्तरपत्रिका फोटोकॉपी देण्याचा कालावधी | १४.०३.२०२३ ते १५.०३.२०२३ |
| १३) | **गुणपडताळणी/फोटोकॉपी निकाल Institute Login व RBTE Login मध्ये जाहिर करण्याचा दिनांक** | १४.०३.२०२३ |

**ब) पुनर्मूल्यांकन (Re-assessment) वेळापत्रक**

**कालावधी – (१५.०३.२०२३ ते ०६.०४.२०२३)**

| अ.क्र. | कार्यवाही | साधारण पुनर्मूल्यांकनाचा कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| १४) | विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या पुनर्मूल्यांकनाकरीता Candidate Login द्वारे अर्ज सादर करावयाचा कालावधी | १५.०३.२०२३ ते १७.०३.२०२३ |
| १५) | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज कन्फर्म करण्याचा कालावधी | १५.०३.२०२३ ते १८.०३.२०२३ |
| १६) | विभागीय कार्यालयाने RBTE Login द्वारे संस्थांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी | १५.०३.२०२३ ते २०.०३.२०२३ |
| १७) | विभागीय कार्यालयांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची माहिती मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | २०.०३.२०२३ |
| १८) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या अर्जानुसार विद्यार्थी आसन क्रमांक व पेपर कोड नुसार माहिती वर्गीकृत करून संबंधित पी सी डी सी व पुनर्मूल्यांकन केंद्राकडे पाठविण्याचा दिनांक | २१.०३.२०२३ |
| १९) | पी सी डी सी ने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केलेल्या मूळ उत्तरपत्रिका संबंधित आर.आर. ए. सी. कडे पाठविण्याचा कालावधी | २१.०३.२०२३ ते २३.०३.२०२३ |
| २०) | आर आर ए सी ने करावयाच्या पुनर्मूल्यांकनाच्या कार्यवाहीचा कालावधी | २३.०३.२०२३ ते २८.०३.२०२३ |
| २१) | आर आर ए सी मध्ये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने करावयाची छाननी व त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या आदेशांचा कालावधी | २५.०३.२०२३ ते २९.०३.२०२३ |
| २२) | विभागीय कार्यालयांनी मुख्य कार्यालयाकडे पुनर्मूल्यांकनाचा अहवाल ऑन लाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी | २९.०३.२०२३ |
| २३) | **पुनर्मूल्यांकनाचा निकाल Institute व RBTE Login मध्ये जाहीर करण्याचा दिनांक** | ३१.०३.२०२३ |
| २४) | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणानुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | ०१.०४.२०२३ ते ०३.०४.२०२३ |
| २५) | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०३.०४.२०२३ |
| २६) | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | ०६.०४.२०२३ |

## विशेष सूचना –

१. **संस्थांनी उपरोक्त तक्त्यातील अ आणि ब वेळापत्रक सुचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.**

२. **विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या कालावधीत अर्ज भरुन संस्थेमार्फत आवश्यक शुल्क भरुन अर्ज विहित कालावधीत Confirm करणे आवश्यक आहे.**

३. **संस्थांनी वेळापत्रकानुसार Confirm केलेले सर्व अर्ज आवश्यक शुल्क भरुन विभागीय कार्यालयात Confirm करणे आवश्यक आहे.**

४. हिवाळी-२०२२ परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी/ पुनर्गुणमुल्यांकनाकरीता अर्ज केला असला तरी उन्हाळी-२०२३ चा परीक्षा अर्ज विहीत कालावधीतच सादर करावा.

५. विद्यार्थ्यांनी प्राप्त फोटोकॉपी मधील गुणांमध्ये बदल असल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांमार्फत संबंधित विभागीय कार्यालयाकडूनच सदर प्रकरणाचा पाठपुरावा करून गुणबदल करणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्याने फोटोकॉपीमधील गुणांमध्ये फरक असल्यास अ. क्र. ५ नुसार कार्यावाही न करता रिअसेसमेंटसाठी अर्ज केल्यास फोटोकॉपीमधील गुणांत बदल ग्राह्य धरला जाणार नाही व रिअसेसमेंट मध्ये मिळालेले गुण अंतिम गुण म्हणून ग्राह्य धरले जातील, ही बाब संबंधित विद्यार्थ्यांना रिअसेसमेंट साठी अर्ज करण्यापूर्वी प्रकर्षाने जाणीव करून देण्यात यावी.

७. संस्थेने विद्यार्थ्यांचा पुनर्गुणमुल्यांकनाचा (Reassessment चा) अर्ज निश्चित करण्याआधी विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा – २०२२ ची मंडळाद्वारे देण्यात आलेली मूळ गुणपत्रिका संस्थेत जमा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पुनर्गुणमुल्यांकनाचा अर्ज निश्चित होणार नाही.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई – ५१

प्रत-

१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीस्तव सादर
२. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय. पुणे / औरंगाबाद / नागपूर/ मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित
३. सहा. सचिव (तां), का. क्र. ४० यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी